**-: प्रेसनोट दिनांक - २५/०४/२०२४ :-**

**आरोपी लोकसेवक श्रीमती किर्ती धनाजी देशमुख, वय - ३२ वर्षे, अन्न सुरक्षा अधिकारी(वर्ग-२) नेमणुक अन्न व औषध प्रशासन कार्यालय, कोल्हापूर रा. विश्व रेसीडेन्सी,फलॅट नं.२०२,ताराबाई पार्क,कोल्हापूर,मूळ रा. समर्थनगर,मोहोळ,ता. माहोळ, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तकारदार यांचे मे.सम्राट फुडस नांवाचे किणी ता.हातकणंगले येथे रेस्टॉरंट आहे. सदर रेस्टॉरंटमधील अन्नपर्थांचे नमूने अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती किर्ती देशमुख यांनी दि.१५/०३/२०२४ रोजी घेतले व कारवाई करायची नसेल तर १,००,०००/- रूपये द्यावे लागतील अशी मागणी केली.

दिनांक २५/०४/२०२४ रोजी तकारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचेकडे तकार अर्ज दिला. तकारीप्रमाणे दिनांक २५/०४/२०२४ रोजी पडताळणी केली असता पडताळणीमध्ये श्रीमती किर्ती धनाजी देशमुख, वय - ३२ वर्षे, अन्न सुरक्षा अधिकारी,वर्ग-२ नेमणुक अन्न व औषध प्रशासन कार्यालय,कोल्हापूर यांनी तकारदार यांचे मे.सम्राट फुडस नांवाचे किणी ता.हातकणंगले येथील रेस्टॉरंटमधील अन्नपर्थांचे घेतले नमून्याप्रमाणे कारवाई न करण्यासाठी तकारदार यांचेकडे प्रथम १,००,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली व तडजोडीअंती ७०,०००/- रूपयांची लाचेची मागणी करून पहिला हप्ता २५,०००/-रू.घेवून येण्यास सांगीतल्याचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.२६/०४/२०२४ सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तकारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक श्रीमती किर्ती धनाजी देशमुख यांनी २५,०००/- रूपये लाच रक्कम स्वत: स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे.

सदरबाबत आरोपी लोकसेवक श्रीमती किर्ती धनाजी देशमुख यांचेविरूध्द ला.प्र.वि.कोल्हापूर येथे पुढील कार्यवाही सुरू असून शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची तजवीज ठेवली आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, संजीव बंबरगेकर, श्रोणी पोलीस उपनिरीक्षक, प्रकाश भंडारे, सहायक पोलीस फौजदार, पो.हे.कॉ. सुधीर पाटील, म.पो.कॉ. पूनम पाटील ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत आपली तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**

**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

**(सरदार नाळे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर**